दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)

लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक) , किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)




छत्रपती संभाजीनगर || वर्ष ६ वे || अंक २१६ || रविवार , ०२ ऑगस्ट २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# जंतर–मंतर आंदोलकांवरील गुन्हे मागे? ‘‘भरकटलेल्या मुलांना शिक्षा नाही, मार्गदर्शन हवे’’ ; पंतप्रधान नरेंद्र मोदींचे भावनिक आवाहन

नवी दिल्ली: दिल्लीतील जंतर–मंतर येथे पार पडलेल्या आंदोलनादरम्यान पंतप्रधानांविरोधात अश्लील आणि अक्षेपार्ह भाषा वापरणाऱ्या तरुण आंदोलकांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीरपणे माफ केले आहे. शुक्रवारी उशिरा रात्री प्रसिद्ध केलेल्या एका विशेष व्हिडिओ संदेशात पंतप्रधानांनी भावनिक साद घालत लहानपणात चुका होतात आणि चुकांमधून शिकण्याची संधीही असते असे प्रतिपादन केले. कायदेशीर कारवाया, न्यायालयाच्या फेऱ्या किंवा सामाजिक दडपणाने परिस्थिती सुधारणार नाही, तर या भरकटलेल्या तरुणांना आपलंसं करून योग्य मार्ग दाखवणे हे समाजाचे कर्तव्य आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.



जंतर–मंतरवर घडलेल्या प्रकाराबद्दल बोलताना पंतप्रधान म्हणाले की, काही खोडकर मुलांनी अत्यंत खालच्या पातळीची भाषा वापरली आणि कोणत्याही सभ्य समाजाला न शोभणारे शब्द वापरले गेले. मला तर शिव्या दिल्याच, पण माझ्या स्वर्गीय आईलाही सोडले नाही, हे अत्यंत दुःखद होते. मात्र लहानपण हे चुकांचे आणि त्यातून शिकण्याचे वय असल्याने मी त्यांना मनापासून माफ करत आहे. आपल्या घरातील मुला–मुलींनी अशा प्रकारची भाषा वापरणे हा एक मोठा सांस्कृतिक धक्का आहे, असे सांगतानाच पंतप्रधानांनी समाजाला शांत राहण्याचे आणि या तरुणांना योग्य दिशा दाखवण्याचे आवाहन केले.

आपल्या भूमिकेचे समर्थन करताना पंतप्रधानांनी एक व्यावहारिक दाखला दिला. जेवताना कधी–कधी स्वतःच्याच दातांखाली आपली जीभ येते आणि रक्त येते, पण म्हणून आपण दात तोडून टाकत नाही. कारण दातही आपलेच असतात आणि जीभही आपलीच असते. ही मुलेदेखील आपलीच आहेत आणि त्यांना शिक्षा देऊन न्यायालयाच्या फेऱ्या मारायला लावण्यापेक्षा योग्य रस्ता दाखवणे हे कठीण असले तरी आपलेच काम आहे.पंतप्रधानांनी आंदोलक तरुणांना थेट उद्देशून एकत्र येण्याचे आवाहन केले. देशासाठी एकत्र मिळून पुढे जाऊया, चुकांमधून शिकूया आणि आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा करूया, असा संदेश त्यांनी दिला. देश वेगाने पुढे जात आहे आणि तुमच्या भविष्यासाठीच मी अहोरात्र कष्ट करत आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.पेपरफुटी व शैक्षणिक मुद्द्यांवरून जंतर–मंतर येथे झालेल्या आंदोलनादरम्यान काही आंदोलकांचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. यामध्ये पंतप्रधान मोदी व त्यांच्या दिवंगत मातोश्रींबद्दल अनुचित शब्द वापरल्याचे दिसून आले होते, ज्यानंतर देशभरातून तीव्र संताप व्यक्त होत होता. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी एफआयआर नोंदवून कायदेशीर पावले उचलण्यास सुरुवात केली होती. मात्र, पंतप्रधान मोदींच्या या व्हिडिओ संदेशानंतर या प्रकरणाला अत्यंत वेगळे आणि सकारात्मक वळण मिळाले आहे.

## ऑगस्टच्या पहिल्याच दिवशी सोनं महागलं! जाणून घ्या तुमच्या शहरातील सोन्या चांदीचे नवीन दर

मुंबई : ऑगस्ट महिन्याची सुरुवात सराफा बाजारासाठी तेजीची ठरली आहे. १ ऑगस्ट रोजी देशांतर्गत बाजारात सोन्याच्या दरात वाढ नोंदवण्यात आली असून, सणासुदीच्या हंगामाची चाहूल लागताच ग्राहकांकडून वाढलेली मागणी ही यामागील प्रमुख कारण मानली जात आहे. दुसरीकडे, चांदीच्या किमतींमध्ये मात्र घसरणीचा कल कायम आहे. राजधानी दिल्लीमध्ये २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १,४४,७६० रुपये, तर २२ कॅरेट सोन्याचा दर १,३२,७१० रुपये इतका नोंदवला गेला आहे. गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या दरात सातत्याने चढ–उतार सुरू असून, सणासुदीपूर्वी खरेदी वाढल्याने बाजारात तेजीचे वातावरण आहे. देशांतर्गत बाजारात सोन्याचे दर वाढत असले तरी जागतिक बाजारात मात्र सोन्यावर दबाव कायम आहे. माहितीनुसार, स्पॉट गोल्डचा भाव ४,०४९.८३ डॉलर प्रति औंस, तर यूएस गोल्ड फ्युचर्स ४,१०७ डॉलर प्रति औंस इतका घसरला आहे. डॉलरच्या मूल्यातील चढ–उतार, जागतिक आर्थिक परिस्थिती आणि गुंतवणूकदारांच्या बदलत्या भूमिकेमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याच्या किमतींवर दबाव निर्माण झाला आहे. प्रमुख शहरांतील सोन्याचे दर (प्रति १० ग्रॅम)दिल्ली – २४ कॅरेट : ₹१,४४,७६० २२ कॅरेट ₹१,३२,७१०मुंबई, पुणे, कोलकाता, चेन्नई आणि बंगळुरू – २४ कॅरेट : ₹१,४४,६१० २२ कॅरेट १,३२,५६०चांदीच्या दरात घसरण :सोन्याच्या तुलनेत चांदीच्या दरात घसरण कायम असून, देशांतर्गत बाजारात चांदीचा भाव प्रति किलो ₹२,३४,९०० इतका नोंदवण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातही स्पॉट सिल्व्हरचा दर ५७.७६ डॉलर प्रति औंस इतका घसरला आहे. पुढे काय?बाजारातील तज्ज्ञांच्या मते, येत्या काही दिवसांत जागतिक आर्थिक घडामोडी, डॉलरची स्थिती, मध्यवर्ती बँकांचे व्याजदर आणि देशांतर्गत मागणी यांचा सोन्या–चांदीच्या किमतींवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांसह दागिने खरेदी करणाऱ्या ग्राहकांचेही सराफा बाजाराकडे लक्ष लागले आहे.




## साईचरणी गुरूपौर्णिमा उत्सवात कोट्यवधींची गुरूदक्षिणा; सुवर्णदानाचा मोठा वर्षाव ; तीन दिवसांत ७.८१ कोटींचं दान

मुंबई : : शिर्डीच्या साईबाबा मंदिरात गुरु पौर्णिमा उत्साहात साजरी झाली असून लाखो भाविकांनी दर्शन घेतल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. साईबाबांच्या तीनदिवसीय गुरुपौर्णिमा उत्सवासाठी देश–विदेशातील लाखो भाविकांनी दर्शन घेतले आहे. त्याचबरोबर लाखो भाविकांनी दर्शनासह साईबाबांच्या चरणी दान केले आहे. गुरूपौर्णिमा उत्सवात साईचरणी कोट्यवधींची गुरूदक्षिणा भाविकांकडून दान करण्यात आली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने बुधवार दि. २८ जुलै २०२६ ते शुक्रवार दि. ३० जुलै २०२६ या कालावधीत




आयोजित केलेल्या श्री गुरूपौर्णिमा उत्सवामध्ये रुपये ७ कोटी ८१ लाख १३ हजार ३७७ इतकी देणगी प्राप्त झाली असल्याची माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली आहे. तीन दिवसांत ७.८१ कोटींचं दानसदर देणगी मध्ये रोख स्वरुपात रुपये ०२ कोटी ०४ लाख ३५ हजार ५५७ दक्षिणा पेटीत प्राप्त झाली असून, देणगी काऊंटरवर ०१ कोटी २५ लाख ४७ हजार ९३५ रुपये, पी.आर.ओ.देणगी ८७ लाख १४ हजार, डेबीट क्रेडीट कार्ड, ऑनलाईन देणगी, चेक डी.डी.देणगी, मनी ऑर्डर असे एकूण ०२ कोटी ०७ लाख ८४ हजार ७०१ रुपये,

परकीय चलनाद्वारे ०५ लाख ६५ हजार ९९१ रुपये, सोने १,१२५.५७० ग्रॅम प्राप्त झाले असून त्याचे मुल्य रक्कम रुपये ०१ कोटी ४६ लाख ७४ हजार ५४४ व चांदी २,३७६.५०० ग्रॅम प्राप्त झाली असून तीचे मुल्य रक्कम रुपये ०३ लाख, ९० हजार ६४९ असे आहे.

साईप्रसादालयात लाखो साईभक्तांना भोजन प्रसाद

श्री गुरूपौर्णिमा उत्सव कालावधीत साधारणतः ०३ लाखाहून अधिक साईभक्तांनी साईदर्शनाचा लाभ घेतला. उत्सव कालावधीमध्ये श्री साईप्रसादालयाद्वारे सुमारे ०१ लाख ९४ हजार २८५ साईभक्तांनी प्रसाद भोजनाचा तर ३९,६११ अन्नप्रसाद पाकिटांचा लाभ घेतला. दर्शन रांगेत ०१ लाख ६५ हजार २०० साईभक्तांना मोफत बुंदी प्रसाद पाकीटांचे वाटप करण्यात आले. या कालावधीत ७१ लाख ०७ हजार ३६० रूपये सशुल्क प्रसादरुपी लाडू पाकीटांच्या माध्यमातून प्राप्त झाले.

# यंदाच्या गणेशोत्सवात पीओपी मूर्तींना परवानगी मिळण्याची शक्यता

मुंबई : आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार राज्य सरकार शाडूच्या (मातीच्या) पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा मोठ्या प्रमाणावर प्रचार आणि प्रसार करणार आहे. मात्र, दुसरीकडे म्हणजेच पीओपीच्या मूर्तींवर यंदाच्या वर्षी तातडीने पूर्ण बंदी घालण्यास सरकारने विरोध दर्शवला आहे. मुंबई उच्च न्यायालयात सुरू असलेल्या एका याचिकेदरम्यान सरकार आपली ही भूमिका मांडणार असल्याचे वृत्त आहे.

न्यायालयात सरकार काय भूमिका मांडणार ?एका प्रसिद्ध इंग्रजी वृत्तपत्राच्या रिपोर्टनुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत शासनाची भूमिका निश्चित करण्यात आली. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने () मे २०२० मध्ये जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत पीओपी मूर्तींवर पूर्ण बंदी घालण्याची मागणी करणारी एक जनहित याचिका () न्यायालयात दाखल आहे. पीओपीच्या मूर्ती पाण्यात लवकर विरघळत नसल्याने जलप्रदूषण होते, असा युक्तिवाद या याचिकेत केला आहे. परंतु, राज्य सरकार कोर्टात स्पष्ट करणार आहे की, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे हे नियम केवळ सल्ला () म्हणून आहेत, ते कायदेशीररित्या बंधनकारक नाहीत. तसेच, पर्यावरणपूरक शाडूच्या मूर्तींना प्रोत्साहन दिले जात असले, तरी अचानक पीओपीवर बंदी आणल्यास हजारो मूर्तिकारांचे मोठे नुकसान होईल, असे सरकारचे म्हणणे आहे.यंदाचा गणेशोत्सव १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या काळात साजरा होणार आहे. या सणासाठी लागणाऱ्या बहुतांश पीओपी मूर्तींचे काम मूर्तिकारांनी आधीच पूर्ण केले आहे. अशा ऐनवेळी जर मूर्तींवर बंदी घातली, तर ती मूर्तिकारांसाठी आर्थिकदृष्ट्या अत्यंत घातक ठरेल आणि इतक्या कमी वेळात हा निर्णय लागू करणे व्यवहार्य नाही, असा मुद्दा सरकार न्यायालयात मांडणार आहे.



यासोबतच, गेल्या चाट वर्षात जलप्रदूषण रोखण्यासाठी सरकारने काय पावले उचलली, याची माहितीही कोर्टाला दिली जाईल. सध्या राज्यातील तब्बल ९८% पीओपी मूर्तींचे विसर्जन हे नैसर्गिक जलाशयांऐवजी कृत्रिम तलावांमध्ये केले जाते, ज्यामुळे नद्या आणि समुद्राचे प्रदूषण मोठ्या प्रमाणावर रोखण्यात यश आले आहे, असा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे.पर्यावरण रक्षणासाठी इतर उपाययोजना आणि सरकारची विनंती

पीओपी मूर्तींच्या पुनर्वापराचे प्रकल्प, पर्यावरणपूरक उत्सवासाठी राबवल्या जाणाऱ्या जनजागृती मोहिमा, मूर्तींची उंची मर्यादित ठेवण्याबाबतची नियमावली, आणि यासाठी स्थापन केलेल्या तज्ज्ञ समितीच्या शिफारसी या सर्वांची सविस्तर माहिती सरकार न्यायालयासमोर ठेवणार आहे. थोडक्यात सांगायचे तर: पर्यावरण रक्षणासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहेच, पण स्थानिक मूर्तिकारांचे आर्थिक हित, त्यांची पूर्वतयारी आणि महाराष्ट्रातील या सर्वात मोठ्या सांस्कृतिक उत्सवात कोणताही विघ्न येऊ नये, हे लक्षात घेता यंदाच्या वर्षापुरती पीओपी मूर्तींची निर्मिती आणि विक्री करण्यास परवानगी देण्यात यावी, अशी विनंती राज्य सरकार मुंबई उच्च न्यायालयाला करणार आहे.

# एलपीजी सिलिंडर २०० रुपयांनी स्वस्त

दिल्ली : व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलिंडरच्या किमतीत १ ऑगस्टपासून मोठी कपात करण्यात आली आहे. तेल विपणन कंपन्यांनी १९ किलोच्या कमर्शियल एलपीजी सिलिंडरच्या दरात दिल्लीत २०२ रुपये, तर कोलकात्यात २०९ रुपयांची घट केली आहे. मात्र, घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

नव्या दरांनुसार, १ ऑगस्टपासून कोलकात्यात १९ किलोचा व्यावसायिक एलपीजी सिलिंडर २,८७२.५० रुपये दराने उपलब्ध होणार आहे. तर दिल्लीतही सिलिंडरच्या दरात २०२ रुपयांची कपात करण्यात आली असून व्यावसायिक ग्राहकांना याचा थेट लाभ मिळणार आहे.

विशेष म्हणजे, सलग दुस–या महिन्यात व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमती कमी करण्यात आल्या आहेत. यापूर्वी १ जुलैपासून दिल्लीतील १९ किलोच्या कमर्शियल एलपीजी सिलिंडरच्या दरात १८३.५० रुपयांची कपात करण्यात आली होती. त्या बदलानंतर दिल्लीतील किरकोळ किंमत २,९३० रुपये झाली होती.



दरम्यान, तेल विपणन कंपन्यांनी १ जुलैपासून ५ किलो फ्री ट्रेड एलपीजी सिलिंडरच्या किमतीतही १३ रुपयांची कपात केली होती. या सुधारणेनंतर दिल्लीमध्ये ५ किलोचा एफटीएल सिलिंडर ८०८.५० रुपये दराने उपलब्ध आहे.

व्यावसायिक वापरासाठी असलेल्या निळ्या एलपीजी सिलिंडरचे दर तेल विपणन कंपन्यांकडून सातत्याने कमी केले जात असले, तरी घरगुती एलपीजी सिलिंडरचे दर मात्र ‘जैसे–थे’च राहिले आहेत. म्हणजेच, घरांमध्ये वापरल्या जाणा–या १४ किलोच्या एलपीजी सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही.

घरगुती गॅस सिलिंडरचे दर ७ जून रोजी निश्चित केलेल्या पातळीवरच कायम आहेत. परिणामी, दिल्लीमध्ये १४ किलोचा एलपीजी सिलिंडर ९४२ रुपयांना उपलब्ध आहे, तर कोलकातामध्ये त्याची किंमत ९६८ रुपयांवर स्थिर आहे. याव्यतिरिक्त, १४ किलोच्या एलपीजी सिलिंडरची किंमत मुंबईत ९४१.५० रुपये आणि चेन्नईमध्ये ९५७.५० रुपये इतकी आहे.

सूर्योदय
रविवार , ०२ ऑगस्ट २०२६

## संपादकीय

### मराठवाड्यात दमदार!

मुंबई, पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रात पावसाने दमदार हजेरी लावल्यानंतर आता पावसाने मराठवाड्याकडे नजर वळवली असून पावसाचा जोर वाढू लागला आहे. काही दिवसांच्या विश्रांतीनंतर गुरुवारी जालना जिल्ह्यासह मराठवाड्यात अनेक ठिकाणी दमदार पाऊस झाला. या पावसामुळे खरीप पिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. हवामान विभागाने नांदेड जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी केला असून विदर्भातील अनेक भागात जोरदार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे मराठवाड्यातील शेतकरी चिंतेत होता. मात्र, गुरुवारी जालना, बदनापूर, अंबड, मंठा, घनसावंगी यासह जिल्ह्यातील अनेक भागात जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे खरीप पिकांवरील उघडिपीचा ताण कमी होण्यास मदत होणार असून पिकांना नवसंजीवनी मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. गुरुवारी नांदेड जिल्ह्यासाठी ‘रेड अलर्ट’ जारी करण्यात आला. जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भातही मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून अमरावती जिल्ह्यातील सिपना नदीला पूर आला आहे. नदी-नाल्यांना मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने काही गावांचा संपर्क तुटला आहे.

पावसामुळे खरीप पिकांना दिलासा मिळाला आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मका आणि इतर खरीप पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड झाली आहे. पावसामुळे जमिनीतील ओलावा वाढण्यास मदत होणार असून पिकांच्या वाढीस पोषक वातावरण निर्माण झाले आहे. पावसाने काही काळ विश्रांती घेतल्याने पिकांच्या वाढीबाबत चिंतेत असलेल्या शेतक-यांना या पावसामुळे दिलासा मिळाला आहे. काही भागात पावसाचा जोर कायम राहिल्यास शेतामध्ये पाणी साचण्याची शक्यता आहे. कमी उंचीच्या आणि निच-याची सुविधा नसलेल्या शेतीतील पिकांवर परिणाम होऊ शकतो. मराठवाड्यात काही ठिकाणी जोरदार तर काही ठिकाणी रिमझिम अथवा मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळत आहेत. जुलै संपत आला तरी अजूनही काही भागात पेरण्या झालेल्या नाहीत. ढगाळ वातावरण तयार होत असले तरी ब-याच ठिकाणी पावसाची हुलकावणी पहायला मिळत होती. भूम आणि लोहारा तालुक्यात हलक्या सरी कोसळल्या तर उमरगा तालुक्यात मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला.

तुळजापूर तालुक्यात भुरभुर तर परंडा, वाशी आणि कळंब तालुक्यात रिमझिम पाऊस झाला. बीड जिल्ह्यात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. भारतीय हवामान विभागाने महाराष्ट्रासाठी पुढील ५ दिवसांचा हवामान अंदाज जारी केला आहे. त्यानुसार विदर्भातील काही जिल्ह्यांसाठी ‘ऑरेंज अलर्ट’ तर राज्यातील बहुतांश भागासाठी ‘यलो’ व ‘ग्रीन अलर्ट’ जारी करण्यात आला आहे. जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, बुलडाणा, अकोला, अमरावती, वाशिम, हिंगोली, नांदेड, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या भागात ‘यलो अलर्ट’ देण्यात आला आहे. मुंबई, पालघर, ठाणे, रायगड, पुणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, अहिल्यानगर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर या भागासाठी ‘ग्रीन अलर्ट’ देण्यात आला आहे. या भागात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. मराठवाड्यात गुरुवारी सर्वदूर दमदार पाऊस झाला. नांदेड, लातूर, हिंगोली, जालना जिल्ह्यात पावसाचा जोर आहे. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत कमी-अधिक प्रमाणात जोरदार पाऊस झाला. गेल्या २४ तासांत छत्रपती संभाजीनगर ६.२ मिमी, जालना ५.१, बीड ६.२, लातूर १९.३, धाराशिव ३.४, नांदेड ३५.५, परभणी १४.१, हिंगोली २०.१ मिमी असा जिल्हानिहाय पाऊस झाला. विभागात एकूण १४.५ मिमी पावसाची नोंद झाली. विभागात आतापर्यंत सरासरी ३१४ मिमी पाऊस होणे अपेक्षित असताना फक्त २५८ मिमी पाऊस झाला आहे.

या पावसामुळे पिकांना जीवदान मिळाले आहे. मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागात पावसासाठी अनुकूल वातावरण असल्याने पुढील काही तासांत काही ठिकाणी जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे. ६ ऑगस्टपर्यंत मराठवाडा, उत्तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भाच्या काही भागात नेहमीच्या सरासरीपेक्षा जास्त पावसाची शक्यता आहे. त्यानंतर पावसाचा जोर थोडा कमी होऊ शकतो. बंगालच्या उपसागरात कमी दाबाच्या क्षेत्रामुळे पुढील चार-पाच दिवस विदर्भासह मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात काही भागात जोरदार तर काही भागात मध्यम स्वरूपाचा पाऊस होऊ शकतो. मराठवाड्यात अजूनही सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. त्यामुळे पुढचे दोन दिवस मराठवाड्यासाठी महत्त्वाचे आहेत. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे लातूर जिल्ह्यातील ४ लाख ३६ हजार ५७१ हेक्टरवरील खरीप पिकांना जीवदान मिळाले आहे.

## परदेशी पाहुण्यांच्या उपस्थितीमुळे स्थानिक तरुणांनाही शेतीकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टिकोन

## जर्मनी व पोर्तुगाल येथील तरुण व तरुणीला लागली भात लावणीची भुरळ..

### शेती व ग्रामीण संस्कृतीचा अभ्यासाठी सुधागड - उद्धर येथे दाखल

सुधागड- पेडली/ कोंडगाव

सुधागड तालुक्यातील कृषी पर्यटन आणि शाश्वत शेतीची थेट युरोपमधील तरुणाईला भुरळ घातली आहे. सुधागड तालुक्यातील उद्धर येथे जर्मनीहून आलेला ॲलेक्स आणि पोर्तुगालची लिली हे दोन तरुण पर्यटक चक्क भाताच्या खाचरात उतरून लावणीचा आनंद घेत आहेत.

त्यांच्या या अनोख्या शेतीप्रेमाची आणि भारतीय संस्कृतीशी समरस होण्याची चर्चा सध्या संपूर्ण तालुक्यात रंगली आहे.

जागतिक स्तरावर पर्माकल्चर (शाश्वत आणि नैसर्गिक शेती) बाबत जनजागृती वाढत असताना, हे परदेशी तरुण भारताच्या पारंपरिक शेती पद्धतीचा अनुभव घेण्यासाठी आले आहेत.

उद्धर येथील आत्मतृप्ती पर्माकल्चरचे संचालक तुषार केळकर यांच्याशी सोशल मीडियाच्या माध्यमातून संपर्क साधून ते येथे पर्यटन व अभ्यास दौऱ्यावर आले आहेत. प्रत्यक्ष मातीत काम करण्याचा व ग्रामीण भागात राहण्याचा अनुभव त्यांना घ्यायचा होता. ॲलेक्स आणि लिली चिखलात उभे राहून भाताची रोपे लावली. त्यांच्या या सहभागामुळे स्थानिक शेतकरीही भारावून गेले आहेत.

भातलावणीच्या अनुभवाविषयी विचारले असता त्यांनी सांगितले की, हे काम आव्हानात्मक असले तरी निसर्गाच्या इतके जवळ जाणे आणि अन्नाच्या निर्मितीची प्रक्रिया प्रत्यक्ष अनुभवणे हा एक अद्भुत प्रकार आहे. केवळ शेतीच नाही, तर महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीचे आणि खाद्यपदार्थांचेही हे परदेशी पाहुणे चाहते झाले आहेत. ग्रामीण पद्धतीचे जेवण आणि आदरातिथ्याने त्यांना भुरळ घातली आहे.



## वराडकर मध्ये शिक्षक-पालक संयुक्त सभा संपन्न

दापोली, : न. का. वराडकर कला व रा. वा. बेलोसे वाणिज्य महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी येथे इयत्ता बारावी कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या पालक व शिक्षकांची संयुक्त सभा उत्साहात संपन्न झाली.ङ्कसभेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत द. कऱ्हाड होते. यावेळी पर्यवेक्षक श्री. लक्ष्मीकांत पाटील, प्राध्यापक श्री. युवराज आग्रे, सौ. समृद्धी खताते व श्री. विजयसिंह वळवी यांनी आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांची दैनिक उपस्थिती, शैक्षणिक प्रगती आणि अभ्यासातील सातत्य याविषयी पालकांना सविस्तर माहिती दिली.ङ्कसभेत दैनिक उपस्थिती, शैक्षणिक प्रगती, करिअर मार्गदर्शन, पूर्व परीक्षा व सराव परीक्षांचे नियोजन या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांनी नियमित उपस्थिती राखून नियोजनबद्ध अभ्यास करावा तसेच आगामी परीक्षांसाठी आतापासूनच तयारीला लागावे, असे मार्गदर्शन करण्यात आले.ङ्कयावेळी पालक प्रतिनिधी श्री. सिद्धार्थ लक्ष्मण पवार यांनी मनोगत व्यक्त करून महाविद्यालयाच्या शैक्षणिक उपक्रमांचे कौतुक केले. प्राचार्य डॉ. भारत द. कऱ्हाड यांनी शिक्षक व पालक यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आवाहन केले.ङ्ककार्यक्रमाचा समारोप सौ. मानसी कोवळे यांनी आभार प्रदर्शनाने झाला. या सभेला बारावी कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.



## कोसबी-फुरूस विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

चिपळूण - प्रदीप भा. पवार

सह्याद्री शिक्षण संस्था सावर्डेचे शावजीराव लक्ष्मणराव निकम माध्यमिक विद्यालय, कोसबी-फुरूस येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध प्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रभावी भाषणे सादर केली. या स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. सताक्षी देशपांडे हिने, द्वितीय क्रमांक कु. योगिनी सावंत हिने, तृतीय क्रमांक कु. अवनी शिर्के हिने तर उत्तेजनार्थ पारितोषिक कु. शर्वरी चव्हाण हिने मिळविले. शिक्षक मनोगतात सोमनाथ भिंगे यांनी लोकमान्य टिळक यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदान, शिक्षणाविषयीचे विचार तसेच




प्रारंभी स्वागतानंतर लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर आधारित भित्तीपत्रकाचे अनावरण विद्यालयाचे मुख्याध्यापक मनोज जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना

पुष्पहार अर्पण करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रप्रेम, स्वराज्याच्या विचारांची प्रेरणा तसेच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य, सामाजिक कार्य आणि समतेच्या संदेशावर लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यसंपदेचा आणि समाजजागृतीच्या कार्याचा सविस्तर आढावा घेत विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय मनोगतात विद्यालयाचे मुख्याध्यापक मनोज जाधव यांनी लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंगांवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. स्वरा घोसाळकर हिने केले, तर आभार प्रदर्शन कु. आस्था जाधव हिने मानले. कार्यक्रमास शिक्षक शंकर गावडे, सचिन पोकळ व विना शिरकर व विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

## लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

मंडणगड : प्रतिनिधी

मंडणगड तालुका विकास मंडळ संचलित लाल बहादूर शास्त्री हायस्कूल, दहागाव येथे समाजप्रबोधन आणि जनजागृतीपर कार्याची सविस्तर माहिती दिली. त्यांच्या विचारांमधून विद्यार्थ्यांनी राष्ट्रप्रेम, सामाजिक समता आणि



शनिवार, दिनांक १ ऑगस्ट २०२६ रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रशालेचे मुख्याध्यापक विजय खाडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर लोकमान्य टिळक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.ङ्कयावेळी विद्यालयातील शिक्षक किशोर कासारे यांनी विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रकार्याची तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, कर्तव्यनिष्ठेचा आदर्श घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.ङ्ककार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. श्रावणी जाधव व कु. सलोनी अष्टमकर यांनी केले. या प्रसंगी मुख्याध्यापक विजय खाडे यांच्यासह शिक्षक विक्रम शेले, मनोज चव्हाण, किशोर कासारे तसेच शिक्षिका सौ. मानसी पालांडे, सौ. विनया नाटेकर, सौ. अनिता बिराजदार उपस्थित होत्या. तसेच शिक्षकेतर कर्मचारी प्रशांत कदम, श्रीम.वैशाली पुदाले, भाई गुडेकर, संजय गौड आणि विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.ङ्कमहापुरुषांच्या विचारांचा वारसा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणारा हा कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

## देव्हारे पंचक्रोशी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, देव्हारे येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथी व आणाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

देव्हारे, दि. १ ऑगस्ट : देव्हारे पंचक्रोशी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, देव्हारे येथे आज लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री. रामचंद्र कापसे सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकमान्य टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.ङ्यावेळी मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक श्री. रामचंद्र कापसे सर यांनी लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्रभक्ती, स्वराज्याच्या विचारांचा तसेच अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक समता, साहित्य आणि लोकजागृतीतील कार्याचा विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा, असे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत सामाजिक जाणीव, राष्ट्रप्रेम आणि संस्कार यांचे महत्त्व ओळखून जबाबदार नागरिक बनावे, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन विद्यालयातील शिक्षकांनी केले असून उपस्थितांनी कार्यक्रमाचे कौतुक केले.

## लाटवन पंचक्रोशी मराठी माध्य विद्यामंदिर येथे लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

मंडणगड तालुका विकास मंडळ संचालित, लाटवन पंचक्रोशी मराठी माध्य विद्यामंदिर येथे आज दिनांक १ ऑगस्ट २०२६रोजी सकाळी मुख्याध्यापक राजकुमार सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.सदर कार्यक्रमाच्या सुरुवातीस लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला मुख्याध्यापक राजकुमार सूर्यवंशी सर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन




केले आणि त्यानंतर शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका सौ चव्हाण मॅडम, सौरभ घोसाळकर,सचिन दहीभाते,सेवक संजय सोंडकर, लेखनिक कृष्णा दळवी तसेच शालेय मुख्यमंत्री जय कदम उपमुख्यमंत्री ईश्वरी सुतार यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर कुमारी सारिका जाधव व इश्वरी सुतार यांनी लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या कार्या बद्दल विचार मांडले,सांस्कृतिक विभागप्रमुख सचिन दहीभाते,सौरभ घोसाळकर सौ चव्हाण मॅडम यांनी लोकमान्य टिळक व अण्णा भाऊ साठे यांच्या बद्दल अभ्यासपूर्ण माहिती दिली. शेवटी विद्यार्थी विद्यार्थिनींनी शालेय जीवनात वरील दोनही महान विभूतींचे विचार आत्मसात करावेत आणि आपले जीवन घडवावे असे अहवान मुख्याध्यापक राजकुमार सूर्यवंशी यांनी केले.सदर कार्यक्रमास सर्व विद्यार्थी विद्यार्थिनीं आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते शेवटी सौरभ घोसाळकर यांनी सर्व उपस्थितताचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# डॉ.बी.ए.हायस्कूल मंडणगड येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

मंडणगड तालुका विकास मंडळ संचलित, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय मंडणगड,येथे अण्णाभाऊ साठे जयंती शाळेचे उपमुख्याध्यापक अर्जुन हुल्लोळी यांच्या अध्यक्षतेखाली अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाला शाळेचे पर्यवेक्षक शांताराम बैकर,शिक्षक-प्रतिनिधी, सांस्कृतिक विभाग प्रमुख बजरंग गावडे,शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन सातवी अ चे विद्यार्थी व वर्गशिक्षिका यांनी केले.सातवीअच्या वर्गशिक्षिका व विद्यार्थी सम्राट इंगळे यांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले.अण्णाभाऊ साठे जयंतीचे औचित्य साधून विद्यालयातील २० विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्याविषयी मराठी व इंग्रजी भाषेत माहिती सांगितली.प्रस्ताविकामध्ये ज्योती राणे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनपटाविषयी माहिती सांगितली. विद्यालयाचे उपमुख्याध्यापक व कार्यक्रमाचे अध्यक्ष अर्जुन हुल्लोळी यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांनी इंग्रजी व मराठी भाषेमध्ये खूप चांगल्या प्रकारची भाषणे केल्याबद्दल कौतुक केले.लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे क्रांतिकारक,साहित्यिक तसेच त्यांनी लिहिलेली फकीरा ही कादंबरी रशियामध्ये प्रसिद्ध झाली त्यांचे सामाजिक कार्य तसेच त्यांना साहित्यरत्न मिळालेले पुरस्कार याविषयी सखोल माहिती सांगितली .शेवटी कुमार सार्थक हेंद्रे या विद्यार्थ्याने उपस्थित सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.



# लोकरंग

१ साप्ताहिक संवाद

खरिपाच्या पेरणीत तूट

नेमची येतो मग पावसाळा या उक्ती प्रमाणे दरवर्षी प्रमाणे यंदा देखील मोसमी पावसाळा सुरवात झालेली असली,तरी राज्यामध्ये हा पाऊस अगदी जूनच्या शेवटी सुरु झाला आहे. त्यातच यंदा अल निनो चे संकट असल्यामुळे पाऊस यंदा कमी पडणार असल्याचे भाकीत हवामान खात्याने वर्तवले आहे. परिणामतः राज्यातील विविध जिल्हयांमध्ये होणारी खरीप हंगामातील शेतातील पेरणी देखील कमी झाली असून शेतीची गती मंदावली आहे. खरीप हंगामातील पेरणीतील तूट आणि शेतीची दुरावस्था याच अनुषन्गाने कृषितज्ज्ञ रमेश पाध्ये यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.



१ यंदाच्या खरीप हंगामाची आणि पावसाच्या अंदाजाची स्थिती नेमकी कशी आहे?

राज्यात यंदा १ जून ते २७ जुलै या कालावधीत सरासरीच्या ९४ टक्के पाऊस पडला असला तरी खरिपाच्या पेरणीने अपेक्षित वेग पकडलेला नाहि. राज्यातील सरासरीच्या १४४. ३६ लाख हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत आतापर्यंत ११७. ६९ लाख हेक्टरवर म्हणजेच ८२ टक्केच पेरणी पूर्ण झालेली आहे. त्यामुळे उर्वरित क्षेत्रात अजूनही पावसाच्या अनुकूलतेची प्रतीक्षा आहे.

२ राज्यातील शेतीची पीकनिहाय आकडेवारी काय आहे?

राज्यात आतापर्यंत ४६६. ८ मिमी पाऊस झाला असून तो सरासरीच्या ९४ टक्के आहे. पीकनिहाय आकडेवारीनुसार भट व नाचणीची पुनर्लागवड सुरु असून,मूग आणि उडीद पिके फुलोऱ्याच्या अवस्थेत आहेत. सोयाबीनची पेरणी सरासरीच्या ९६ टक्क्यापर्यंत पोहोचली असली तरी भाताची पेरणी केवळ ३९ टक्के बाजरीची,४९ टक्के,रंगीची २५ टक्के,मूग आणि उडीद प्रत्येकी ४५ टक्के तर कापसाची पेरणी ८५ टक्के झाली आहे. त्यामुळे काही भागातील पावसाच्या विषम वितरणाचा परिणाम पेरणीवर झाल्याचे स्पष्ट आहे .

३जुलै महिन्यातील अतिवृष्टीमुळे शेतीचे किती नुकसान झालेले आहे?

राज्यात जुलै मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान झालेले आहे. २७ जुलै च्या प्राथमिक अहवालानुसार ९१५७ हेक्टरवरील पिके बाधित झाली आहेत. रायगड,पुणे,बुलढाणा,रायगड,नाशिक,रत्नागिरी आणि पालघर सह नऊ जिल्ह्यातील भात,सोयाबीन,कापूस,मका,भाजीपाला आणि फळपिकांना मोठ्या प्रमाणात फटका बसलेला आहे. त्याआधी जून महिन्यातील अवकाळी पाऊस,अतिवृष्टी आणि गारपिटीमुळे १८ जिल्ह्यातील २०५२६ हेक्टर क्षेत्र बाधित झालेले आहे.पुढील काही दिवसात पावसाचे प्रमाण वाढेल आणि उर्वरित क्षेत्रातील शेतीच्या पेरणीला गती येईल अशी अपेक्षा आहे.

२ नोंद

हृदयाच्या ठोक्यांतील अनियमितता वेळेत ओळखा

हृदयाच्या ठोक्यांशी संबंधित समस्या म्हटल्या की अनेकदा गंभीर हृदयविकारांचा विचार केला जातो. मात्र, काही वेळा त्याची सुरुवात अगदी सौम्य लक्षणांनीही होऊ शकते. उदाहरणार्थ, हृदयाचे ठोके अनियमित वाटणे, काही क्षणांसाठी छातीत फडफड जाणवणे किंवा अचानक हृदयाचे ठोके खूप वेगाने पडू लागणे. ही लक्षणे ॲरिदमिया या आजाराची असू शकतात. ॲबॉटच्या भारत, दक्षिण-पूर्व आशिया, हाँगकाँग, तैवान आणि कोरिया येथील कार्डियाक रिदम मॅनेजमेंट व्यवसायाचे जनरल मॅनेजर अजय सिंह चौहान म्हणाले, ‘‘हृदयाच्या ठोक्यांतील अनियमिततेच्या समस्येसह जगणाऱ्या लोकांसाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांना वेळेवर, प्रभावी आणि त्यांच्या दैनंदिन जीवनात सहजपणे सामावून घेता येईल असे उपचार मिळणे, ज्यामुळे ते लवकरात लवकर आपल्या नेहमीच्या आयुष्यात परतू शकतील. ॲबॉटमध्ये आम्ही हा संपूर्ण उपचारांचा प्रवास अधिक सोपा करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित निरीक्षणाच्या मदतीने आजाराचे लवकर निदान होण्यास सहाय्य करणे आणि ब्रॅडीकार्डियासारख्या हृदयाच्या ठोक्यांशी संबंधित विकारांवर आधुनिक उपचार रुग्णांपर्यंत पोहोचवणे यांचा समावेश आहे.लीडलेस पेसमेकरसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची रचना लीडशी संबंधित गुंतागुंत आणि संसर्गाचा धोका कमी करण्यासाठी करण्यात आली आहे.


मुंबईतील एस. एल. रहेजा हॉस्पिटल येथील कार्डिओलॉजी विभागाचे संचालक डॉ. हरेश मेहता म्हणाले, ‘‘दरवर्षी अनेक रुग्ण हृदयाच्या ठोक्यांतील अनियमिततेवर नियंत्रण ठेवण्यासाठी पेसमेकरवर अवलंबून असतात. पारंपरिक पेसमेकर प्रभावी असले तरी लीडलेस पेसमेकर हा कमी हस्तक्षेपाची आवश्यकता असलेला पर्याय उपलब्ध करून देतो. या पद्धतीमध्ये शरीरावर कोणताही दिसणारा व्रण राहत नाही आणि प्रक्रियेशी संबंधित धोकाही तुलनेने कमी असतो. योग्य रुग्णांसाठी यामुळे लवकर बरे होणे, अधिक आराम मिळणे आणि दैनंदिन जीवनात लवकर परतता येणे शक्य होऊ शकते.

३ दखल

एएनएमआयची ३१ वर्षेपूर्ती आणि वित्तीय समावेशनावर भविष्याच्या दिशेने प्रगती.

असोसिएशन ऑफ एनएसई मेंबर्स ऑफ इंडिया (एएनएमआय) ने नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एनएसई) येथे आपला ३१ वा स्थापना दिवस साजरा केला. या कार्यक्रमात गेल्या तीन दशकांमध्ये भारताच्या भांडवली बाजारांच्या विकासातील संस्थेच्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा गौरव करण्यात आला. मुंबईतील एनएसई ॲट्रियम येथे आयोजित या कार्यक्रमाला नियामक, एक्सचेंजचे वरिष्ठ अधिकारी, बाजार मध्यस्थ आणि प्रमुख उद्योग क्षेत्रातील भागधारक उपस्थित होते. त्यांनी भारताच्या भांडवली बाजारांच्या उल्लेखनीय प्रवासावर चिंतन केले आणि त्याचे भविष्य घडवण्यासाठी आपली सामायिक वचनबद्धता पुन्हा एकदा व्यक्त केली.

भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळ (सेबी) चे कार्यकारी संचालक श्री गोविंदपल्ली राम मोहन राव हे प्रमुख पाहुणे होते, तर नॅशनल स्टॉक एक्सचेंजचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आशिष कुमार चौहान हे सन्माननीय पाहुणे होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान एएनएमआयचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री कमलेश डी. श्रॉफ यांनी भूषवले. बाजार मध्यस्थांसाठी एक खंबीर आणि विश्वासार्ह आवाज बनण्याच्या उद्देशाने १९९५ मध्ये स्थापित झालेली एएनएमआय आज देशभरातील ८०० हून अधिक ब्रोकर सदस्यांसह, भारतातील भांडवली बाजार मध्यस्थांची सर्वात मोठी संघटना बनली आहे. गेल्या ३१ वर्षांमध्ये, एएनएमआयने नियामक, स्टॉक एक्सचेंज आणि बाजार सहभागींसोबत मिळून पुरोगामी सुधारणांना पाठिंबा देण्यासाठी, उद्योग संवादाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि एका पारदर्शक, मजबूत व गुंतवणूकदार-केंद्रित प्रतिभूती बाजाराच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी काम केले आहे.भारताच्या भांडवली बाजाराच्या उत्क्रांतीचा पुढील टप्पा कृत्रिम बुद्धिमत्ता डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, टोकनायझेशन, सायबर सुरक्षा, आर्थिक समावेशन आणि निरंतर नावीन्यपूर्णतेद्वारे चालवला जाईल.



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क –९८३३१४६३५६**
**इमेल –**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
रविवार , ०२ ऑगस्ट २०२६ 

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## वर्षावासानिमित्त धम्म बंधुत्वाचा सामाजिक संदेश

पनवेल प्रतिनिधी–सुनील जाधव

नवीमुंबई,वर्षावास आषाढी पोर्णिमा निमित्त भारतरत्न डॉ.बाबासाहेब आबेंडकर सामाजिक व सांस्क्रुतिक मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला धम्म बांधवाची ग्रुहभेट हा उपक्रम उत्साहपुर्ण वातावरणामध्ये पार पाडला.




तथागत भगवान गौतम बुद्धांच्या प्रथम उपदेश दिनाचे औचित्य साधुन या कार्यक्रमाला धम्म अनुयायीनीं उत्सफुर्त प्रतिसाद दिला.कार्यक्रमा दरम्यान सामुहिक बुद्ध वंदना घेण्यांत आली.उपस्थितांनी बुद्ध,धम्म आणि संघ यांच्या शिकवणीचा अंगीकार करुन समाजामध्ये बंधुता,समता आणि एकात्मता व करुणेचे मुल्य जोपासण्याचा निर्धार व्यक्त केला.दरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक व सांस्क्रुत्रिक मंडळाच्या वतीने दर रविवारी सकाळी १० ते ११ या वेळेमध्ये अशाच प्रकारचे ग्रुहभेट व धम्मप्रबोधनाचे उपक्रम विविध ठिकाणी आयोजित करण्यात येणार असल्याची आयोजकांनी माहीती आयोजकांनी दिली.

## गुरु विविध रूपात असतो आणि मार्ग दाखवतो त्या सर्वव्यापी गुरूला नतमस्तक व्हा.प्रा. अशोक देशमुख

दापोली:–

पर्यावरण अभ्यासक डॉ.प्रशांत परांजपे यांचे वडील कै.अशोक परांजपे सर यांच्या भागवत विषयावरील (निरूपणकार ह.भ. प .श्री आनंद बुवा जोशी यांच्या निरुपणावर आधारित ) पुस्तकाचे प्रकाशन गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने २९ जुलै २०२६ रोजी ह .भ .प. प्रा.अशोक देशमुख यांच्या हस्ते टेंब्ये स्वामी मठ ब्राह्मणवाडी जालगाव येथे करण्यात आले ङ्गपुस्तक प्रकाशनाचे पूर्वी प्रा. देशमुख यांचे गुरुपौर्णिमेनिमित्त प्रवचन आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी गुरुच्या विविध रूपा बद्दल विवेचन केले. आणि सर्व व्यापी गुरूला नतमस्तक होऊन आत्मज्ञानअनुभवण्या बाबत विवेचन केले.

अशोक परांजपे सर यांचे पुस्तक प्रत्येकाचे संग्रही असावे आणि सोप्या भाषेतून साकारलेले भागवत स्कंध पुराणातील आठ स्कंध समजून घ्यावेत असे आवाहन प्रा. देशमुख यांनी या वेळी केले.

प्रकाशन सोहळ्याकरता श्री टेंबे स्वामी मठाचे संस्थापक मोरेश्वर फाटक, माधुरी फाटक, डॉ.प्रशांत परांजपे, अध्यक्ष अरविंद जोशी, भारदे बुवा, ह.भ.प.स्वानंद आपटे, निलीमा परांजपे आणि सर्व पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.सूत्रसंचालन किरण पेंडसे गुरुजी यांनी तर ऋणनिर्देश अस्मिता परांजपे यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीते करिता कार्याध्यक्ष जगदीश कोकाटे, उपाध्यक्ष राजेंद्र पतंगे सचिव दत्तात्रय मराठे, खजिनदार श्रुती पटवर्धन आणि कविता मराठे बाई आदी पदाधिकाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले. बहुसंख्य भक्तगणांच्या मंगलमय उपस्थिती आणि भक्तिमय वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला. महाप्रसादा नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## मराठा क्रांती स्वराज्य संघटना व रॅलीज इंडिया कंपनी लोटे यांच्या संयुक्त विद्यमाने बिजघर नं. १ शाळेत वह्यावाटप

ज्या समाजामध्ये आपला जन्म झाला ज्या समाजामध्ये आपण राहतो त्या समाजाचे आपण देणे लागतो या प्रगल्भ भावनेतून मराठा क्रांती स्वराज्य संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा बिजघर गावचे सुपुत्र सदानंदराव भोसले व रॅलीज इंडिया कंपनी लोटे यांच्या संयुक्त विद्यमाने बिजघर नं १ शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले ङ्ग या कार्यक्रमासाठी गावच्या प्रशासक शुभांगी भोसले, मराठा क्रांती स्वराज्य संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सदानंदराव भोसले जिल्हा संपर्कप्रमुख महेश राव मोरे निवृत्त कॅप्टन राजारामराव भोसले सामाजिक कार्यकर्ते नारायणराव भोसले मानकरी सुनीलराव भोसले तिसंगी येथील प्रतिष्ठित नागरिक अनंतराव भोसले, विद्यार्थी संघाचे अध्यक्ष राजेंद्र भोसले, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भगवान जंगम अनिल जाधव राजू उपाध्यक्ष निवृत्त पोलीस अधिकारी लक्ष्मणराव भोसले निवृत्त पोलीस अधिकारी संजय राव भोसले सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र वामन भोसले निवृत्त पोलीस अधिकारी सुप्रियाताई भोसले राजश्री सदानंद भोसले वसंतराव भोसले दशरथङ्ग भोसले चंद्रकांतराव भोसले संजय दत्ताराम भोसले आकांक्षा जंगम कीर्ती मोहिते आदी मान्यवर उपस्थित होते ङ्ग सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत शाळेच्या मुख्याध्यापिका भाग्यश्री काणेकर यांनी केले संपूर्ण कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्रसंचालन व आभार शैलेश पराडकर यांनी मानले



## रा.जि .प. आदर्श शाळा निवी येथे गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली

इंदापूर विभाग प्रतिनिधी!!

गौतम साळवी ङ्गङ्ग कार्यक्रमाची सुरुवात गुरुच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन व गुरुवंदनेने सुरु झाली.



भारतीय संस्कृतीतील गुरु–शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करत गुरूंच्या मार्गदर्शनाचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील स्थान स्पष्ट केले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत गुरूंचा आदर, ज्ञानाची साधना आणि जीवनातील मूल्यांचे महत्त्व याविषयी प्रेरणादायी विचार मांडले. गुरूंच्या ऋणाची जाणीव प्रत्येकाने आयुष्यभर जपावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गुरूंप्रती आपल्या भावना आणि कृतज्ञता व्यक्त करणारी मनोगते सादर केली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगिताने करण्यात आली.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. गुरुपौर्णिमेचा हा कार्यक्रम भक्तिमय, प्रेरणादायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## पालक शिक्षक संघाची सर्वसाधारण सभा संपन्न

मंडणगड : प्रतिनिधी, येथील मंडणगड तालुका विकास मंडळ संचालित लाल बहादूर शास्त्री हायस्कूल दहागाव, या प्रशालेमध्ये गुरुवार दिनांक ३० जुलै २०२६ रोजी पालक शिक्षक संघाची सर्व साधारण सभा संपन्न झाली.




सर्वप्रथम प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. विजय खाडे यांनी उपस्थित माजी पालक शिक्षक संघाचे पदाधिकारी, पालक वर्ग यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. यानंतर विभाग प्रमुख श्री. विक्रम शेले यांनी प्रास्ताविक करत मागील सभेचे इतिवृत्त वाचन केले. त्याला सर्वांनी अनुमोदन दिले व मंजूर करून घेतले. त्यानंतर विज्ञान शिक्षिका अनिता बिराजदार यांनी मार्च २०२६ एसएससी बोर्ड परीक्षेचा निकाल वाचून दाखवला. प्रशालेतील शिक्षक किशोर कासारे यांनी महाराष्ट्र शासन व समाज कल्याण विभागा कडून दिल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्ती व त्यांना आवश्यक कागदपत्रे यांची माहिती दिली. यानंतर मनोज चव्हाण यांनी सहशालेय उपक्रम, क्रीडा व विद्यार्थी पालक यांमधील सुसंवाद, पालक जबाबदारी याबाबत मार्गदर्शन केले. यानंतर या सभेला उपस्थित पालक अरविंद पाटणकर यांनीही मार्गदर्शन केले. शेवटी सभेचे अध्यक्ष प्रशालेचे मुख्याध्यापक विजय खाडे यांनीही पालकांना मार्गदर्शन केले. बदलती परिस्थिती, मुलांवरील प्रभाव आणि अशा परिस्थितीत पालकांची जबाबदारी व विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी पालकांचे सहकार्य याबाबत मार्गदर्शन केले.ङ्ग या सभेला शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष दत्ताराम जाधव, दहागाव चे सरपंच मंगेश दळवी, अरविंद पाटणकर,नथुराम सुखदरे सौ. पवार व पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.ङ्ग प्रशालेतील शिक्षक किशोर कासारे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानून सभेची सांगता करण्यात आली.

## गुरुपौर्णिमा महोत्सव श्री स्वामी समर्थ मठ नगावे सफाळे येथे अतिशय उत्साहात साजरा

पालघर (प्रतिनिधी): सालाबाद प्रमाणे यंदाही दि. २९ जुलै २०२६ आषाढ शुक्ल पक्ष द्वितीया ह्या दिवशी '' श्री अक्कलकोट स्वामी महाराज ''गुरुपौर्णिमा महोत्सव २०२६'' श्री स्वामी समर्थ मठ नगावे सफाळे जिल्हा पालघर येथे आयोजित करण्यात आला होता.ङ्गङ्गसकाळी ८ वाजता स्वामींचा महाभिषेक नंतर सकाळी सत्यनारायणाची पूजा, महाआरती व महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले होते. हजारो स्वामी भक्त, ग्रामस्थ व मान्यवर ह्या महोत्सवात उपस्थित होते.ङ्गङ्गजिल्हा परिषद शाळा नगावे या शाळेतील विध्यार्थी व शिक्षक यांनी देखील या महोत्सवाला उपस्थित राहून, आंनद व्यक्त केला व महाप्रसादाचा लाभ घेतला.ङ्गङ्गश्री स्वामी समर्थ मठ नगावे व श्री शरणाय कवचाय श्री स्वामी समर्थ मठ नगावे फॉउंडेशनच्या वतीने नगावे गावातील पाड्यातील शाळेतील लहान मुलांना स्वेटर, शैक्षणिक वस्तू रुपीचे वाटप केले जाते.ङ्गङ्गश्री स्वामी समर्थ मठ नगावे यांच्या वतीने दर गुरुवारी स्वामीची आराधना, अध्ययन, उपासना, नामस्मरण, महा जप, महा आरती मोठया उत्साहाने केला जातो. स्वामी प्रकटदिन, दत्त जयंती, गुरुपौर्णिमा अतिशय जलोष्यात साजरा केला जातो.



भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )